



# आज १५०० पैकी ११८९ उमेदवारांनी लावली हजेरी त्यापैकी ८३० पात्र

■अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■

पोलीस दलातर्फे, पोलीस अधीक्षक श्री. अचिंत चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२४ २०२५ मधील, पोलीस शिपाई १६१ पदांची भरती प्रक्रिया दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०५.०० वाजता पासून पोलीस मुख्यालय, अकोला येथे सुरू करण्यात आली आहे. एकूण १६१ पोलीस शिपाई पदांसाठी ११,७८४ अर्ज प्राप्त झाले आहेत.

आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी १५०० उमेदवारांना बोलावण्यात आले, त्यापैकी ११८९ उमेदवार उपस्थित होते. त्यापैकी ८३० उमेदवार पात्र ठरले.

भरती प्रक्रियेत शारीरिक मोजमाप, मैदानी चाचणी व कागदपत्र तपासणीचा समावेश आहे. भरती प्रक्रिया महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नुसार सुरळीत, पारदर्शक व सुरक्षित पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेदवारांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका, मोबाइल टॉयलेट, झ.अ. सिस्टीम आदी सुविधा उपलब्ध आहेत. ओळख तपासणीसाठी डिजिटल फोटो, बायोमेट्रिक प्रणाली व RFID तंत्रज्ञान वापरण्यात येत असून संपूर्ण प्रक्रिया उउढत व व्हिडिओ चित्रीकरणाखाली पार पडत आहे. कोणत्याही गैरप्रकार आढळून आल्यास कडक कारवाई करण्यात येणार आहे




उमेदवारांनी आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे व दोन झेरॉक्स प्रती सोबत आणणे अनिवार्य आहे- पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान आवश्यक कागदपत्रे - उम ेदवारांनी आधारकार्ड, पासपोर्ट साईज रंगीत फोटो (६ प्रती), १२ वी पास गुणपत्रिका / बोर्ड प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला (ढउ), जन्मदाखला किंवा एस.एस.सी. बोर्ड प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास), ई.डब्ल्यू.एस. / एस.ई.बी.सी. प्रमाणपत्र (लागू असल्यास) तसेच इतर आवश्यक कौशल्य प्रमाणपत्रे (असल्यास) सोबत आणणे अनिवार्य आहे. समांतर आरक्षणातील उमेदवार ( माजी सैनिक, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर, गृह रक्षक दल, पोलीस पाल्य, अनाथ इ.) यांनी संबंधित वैध प्रमाणपत्रे अनिवार्यपणे सादर करावीत. टीप : सर्व उमेदवारांनी वरील सर्व कागदपत्रांची एक मूळ प्रत व दोन झेरॉक्स प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. सर्व प्रमाणपत्रे दि. ०७.१२.२०२५ पूर्वीची असावीत.

भरती प्रक्रियेदरम्यान कोणतेही गैरप्रकार घडू नयेत यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे २ अधिकारी २० अंम लदार तैनात ठेवण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार सूक्ष्म अंगझडती घेण्यात येईल. स्टेरॉईड किंवा अन्य उत्तेजक द्रव्ये आढळून आल्यास संबंधित उमेदवाराची वैद्यकीय तपासणी करून निष्कर्षानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना सामान्य प्रकारचे स्पोर्ट्स शूज वापरण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र स्पाईक शूज किंवा विशेष प्रकारचे शूज वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी राहण्याची व्यवस्था मल्टिपर्पज हॉल, निमवाडी पोलीस वसाहत, अकोला येथे करण्यात आली आहे. तसेच प्रक्रिये दरम्यान केळी, बिस्कीट, ग्लुकोज वाटप करण्यात आले.

पोलीस शिपाई भरती २०२४ २०२५ प्रक्रियेसाठी उपस्थित होणाऱ्या सर्व उमेदवारांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, काही फसवणूक करणारे इसम 'पोलीस भरती करून देतो', 'ओळखीचा वापर करून मदत करतो' अशा प्रकारची खोटी आश्वासने देऊन उम ेदवारांकडून पैशांची मागणी करण्याचा प्रयत्न करु शकतात. कृपया अशा कोणत्याही इसमांवर विश्वास ठेवू नये. पोलीस भरती प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक असून ती सीसीटीव्ही निगराणीखाली, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व कडक पोलीस बंदोबस्तात पार पाडली जाणार आहे. पोलीस भरतीसाठी कोणतेही पैसे देण्याची आवश्यकता नाही. आपल्याकडे कोणीही पैशांची मागणी केल्यास, तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात, किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला- मदत क्रमांक १०६४ येथे त्वरित संपर्क करावा.

## राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनी अकोल्याच्या रवींद्र पाडवी देशात प्रथम

■अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■

स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया, डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन प्री युनिव्हर्सिटी बंगळूरू व डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन (प्री युनिव्हर्सिटी) बंगळूरू नॉर्थ डिस्टिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६९ वी नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप दि.०४ ते ०९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान बेंगलुरु येथे आयोजित राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग चॅम्पियनशिप मध्ये क्रीडा प्रबोधिनी अकोल्याचा रवींद्र पाडवी देशात प्रथम. ६९ वी राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग चॅम्पियनशिप बेंगलुरु कर्नाटक येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत ४९ ते ५२ किलो वजनगटात बॉक्सिंग खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करित सुवर्ण पदक प्राप्त केले. रवींद्र पाडवी अंतरराष्ट्रीय स्पर्धेपूर्व शिबीरात सहभाग घेतलेला आहे. रवींद्र पाडवी याला जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला तसेच आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग कोच मा.




सतीशचंद्र भट्ट सरांचे मार्गदर्शन लाभले.त्याच्या या यशाबद्दल अकोला जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी मा. सतीश्चंद्र भट्ट साहेबांनी त्याचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५' साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

■अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■

माहितीव जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत.अर्जाचे नमुने dgir.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## महाशिवरात्रीनिमित्त कवठा येथे संत संमेलन

■अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■

मानव उत्थान सेवा समिती, अकोला आणि श्री गौरीशंकर शिव मंदिर, कवठा यांच्या संयुक्त विद्यमाने, रविवार, १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर भव्य संत संमेलन आणि नशा निर्मूलन रैली आयोजित करण्यात आली आहे.महाशिवरात्री उत्सवादरम्यान, बाळापूर तहसीलम धील कवठा गावातील श्री गौरीशंकर शिव मंदिरात मानव धमार्चे संस्थापक सद्गुरु श्री सतपालजी महाराज यांच्या आत्मसाक्षात्कारी शिष्या संत महात्मा



मैत्रेयीबाईजी आणि महात्मा महाश्वेताबाईजी यांचे सर्व धार्मिक शास्त्रांवर आधारित सत्संग प्रवचन सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यापूर्वी, नशा निमूलन रैली काढण्यात येईल. मानव उत्थान सेवा समिती, अकोला आणि श्री गौरीशंकर शिव मंदिर, कवठा, सर्व भक्तांना भव्य संत सम्मेलनाला उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

## सेतू संचालकांनी फोटो वरून केसेस करू नये - तहसीलदारांचे आवाहन

**अकोला** : अकोला तालुक्यातील महा ई सेवा केंद्र संचालकांनी फोटो वरून केसेस करू नये असे आवाहन तहसीलदार कुणाल झालटे यांनी केले आहे. महा ई सेवा केंद्रातून विविध प्रकारचे प्रमाणपत्र देण्यात येतात. याम ध्ये जातीचा दाखला, नॉन क्रिमीलियर अकोलासर्टिफिकेट, अधिवास प्रम ाणपत्र तसेच विविध प्रकारची प्रतिज्ञापत्र देण्यात येतात. तेव्हा प्रत्यक्षात लाभार्थी हजर असणे गरजेचे असते. मात्र काही सेतू संचालक फोटो वरून केसेस करतात अशी बाब निर्दर्शनास आली आहे. तेव्हा सेतू संचालकांनी असे करू नये असे आवाहन तहसीलदार कुणाल झालटे यांनी केले आहे.

## वांड्याभ्यासा शिवाय संत समजणे अशक्य : श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ

■अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■

सर्वसामान्यांच्या बुद्धीस अनाकलनीय घटना ज्यामध्ये ग्रंथीत केलेल्या असतात त्याला चरित्र असे म्हणतात . वारकरी संतांचे चरित्र कळण्याकरिता केवळ तर्काचा आधार न घेता किंवा ऐतिहासिक कागदी घोडे न नाचवता साहित्यिक तथा संशोधकांनी त्या संतांनी निर्माण केलेल्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी , भागवत व गाथा या वारकरी प्रस्थांनत्रयीचा आधी सखोल अभ्यास करावा . कारण ते ग्रंथ म्हणजे केवळ यमक जोडून निर्माण केलेले काव्य नसून , ते प्रत्यक्ष त्यांचे वांययीन स्वरूप आहेत. म्हणून प्रत्यक्ष वांययाभ्यासाशिवाय संत चरित्र कळणे अशक्य असल्याचे सप्रमाण अभ्यासपूर्णमत भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले.ते आज संत श्री वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे आयोजित ताटी उघडा ज्ञानेश्वरा ज्ञानयज्ञ सप्ताहातील द्वितीय पुष्प गुफिंत असतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की, वारकरी संत वायमय हे शब्दाच्या पंखावर बसून कल्पनेच्या आकाशात केलेले स्वैर



उड्डाण नसून, ते संतांचे प्रत्यक्ष शब्दचित्र असल्याने ज्ञानोबाराय कळावे याकरिता ज्ञानेश्वरी व तुकोबाराय कळून घ्यायचे असतील तर त्यांची गाथा अभ्यासने गरजेचे आहे. वारकरी संप्रदायाचा देव जेवढा मोठा आहे.

त्याहीपेक्षा त्यास आपल्या पोटात साठविणारे व आज्ञेत वागविणारे संत मोठे आहेत. याची प्रत्यक्ष प्रचिती त्यांच्या साहित्यातून आपणास दिसून येते. विद्वानांची डोके चालतात परंतु चालण्याचे काम मात्र पायालाच करावे लागते. म्हणून जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात देवा ! तू जरी डोक असला तरीही आम्ही मात्र पाय आहोत .' हेम अळंकार नामीं श्र तुका म्हणे तैसे आम्ही श्रश्र 'अर्थात तू जर शुद्ध सोने असशील तर, आम्ही त्यापासून बनलेले अलंकार आहोत. सोन्याला किंमत आहे परंतु शोभा नाही.

म्हणून सोन्याला शोभा यावी असे वाटत असेल तर , त्याचे अलंकार बनले पाहिजेत. आणि अलंकाराला किंमत येण्याकरिता ते सुद्धा सोन्याचे असले पाहिजेत. म्हणून हे देवा ! तुझ्यात आणि माझ्यात वास्तविक पाहता कुठलाही भेद नसून , जगात केवळ प्रेम सुख वाढविण्याकरिता आम्ही कल्पितभेद मानून तू देव आणि आम्ही भक्त या भूमिकेतून तुझी मनोभावे सेवा करीत असतो. याहीउपर असलाच भेद तर तो फक्त नावापुरताच जसे तू पांडोबा तर आम्ही ज्ञानोबा , एकोबा , तुकोबा एवढाच फरक आहे.

## लहुजी शक्ती सेना पश्चिम विदर्भाची अमरावती येथे ठोस भूमिका

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जाचक अटी रद्द करण्याची मागणी

■अकोला,दि.१४ (प्रतिनिधी)■

लहुजी शक्ती सेना पश्चिम विदर्भाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कर्ज योजनांम धील जाचक अटी तात्काळ रद्द करण्यात याव्यात, अशी ठोस मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश महासचिव श्री वाम नरावजी भिसे यांच्या नेतृत्वात तसेच पश्चिम विदर्भ महासचिव श्री प्रकाशभाऊ दांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत अमरावती येथे प्रादेशिक व्यवस्थापक श्री लाचारवार साहेब यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.महामंडळामार्फत गेल्या एक वर्षापासून सुविधा योजनेअंतर्गत प्रत्येकी रु. ५,००,००० (पाच लाख) कर्ज प्रकरणे 'लकी ड्रॉ' पद्धतीने जिल्हानिहाय उद्दिष्टांच्या आधारे मंजूर करण्यात आली होती. मात्र शासनाने घातलेल्या जाचक अटी, अर्जदारांचा अनिवार्य आर्थिक



सहभाग व हमी शुल्क भरण्याच्या नियमामुळे मातंग समाजातील अनेक इच्छुक लाभार्थी कर्ज प्रक्रियेत सहभागी होऊ शकले नाहीत. परिणामी, महामंडळाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास अडथळे निर्माण होत असून समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींची मोठ्या प्रमाणात निराशा होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.लहुजी शक्ती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, मातंग समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे अर्जदारांकडून अपेक्षित सहभाग रक्कम व हमी शुल्क भरणे अनेकांसाठी अशक्य ठरत आहे. त्यामुळे पात्र असूनही अनेकांना कर्जाचा लाभ मिळत नाही. ही बाब सामाजिक न्यायाच्या तत्वांना धरून नसून शासनाने तातडीने या अटी शिथिल किंवा रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.यासोबतच लकी ड्रॉ प्रक्रियेत ज्यांचा क्रमांक लागला नाही, अशा अर्जदारांनाही पर्यायी मार्गाने तात्काळ न्याय द्यावा, जेणेकरून समाजातील होतकरू नागरिकांना स्वतःचा व्यवसाय उभारण्याची संधी मिळेल आणि आर्थिक स्वावलंबन साधता येईल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले.प्रादेशिक व्यवस्थापक श्री लाचारवार यांनी निवेदन स्वीकारून संबंधित मागण्या शासन पातळीवर पोहोचविण्याचे आश्वासन दिल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## जीवनाचे सार्थक करायचं असेल तर ज्ञानेश्वरी वाचा : हभप गणेश महाराज साठे

■बाळापुर,दि.१४ (प्रतिनिधी)■

जीवनात येणाऱ्या प्रत्येक अडचणीचे प्रत्येक समस्याचे उत्तर ग्रंथराज ज्ञानेश्वरी च्या प्रत्येक ओवीमध्ये आहे संत ज्ञानेश्वर महाराज्यांच्या जीवनात आलेला संघर्ष आणि समस्या यावर मात करून अखिल विश्वाच्या कल्यानासाठी त्यांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला आहे.

ज्ञान आणि विज्ञान याचा संगम या ग्रंथात असून प्रत्येकाने आपल्या जीवाचं कल्याण करायच असेल तर दररोज या ग्रंथातील एक तरी ओवी वाचून त्यानुसार जीवन जगण्याचा प्रयत्न करावा असं आवाहन वाणीभूषण हभप गणेश महाराज साठे यांनी केलं ते बोरगाव वैराळे येथे स्वातंत्र्य सैनिक स्व खा नानासाहेब वैराळे यांच्या मातोश्री स्व मनकर्णाबाई वैराळे यांनी स्थापन केलेल्या जागेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त आयोजित वार्षिक सप्ताह मध्ये कीर्तन प्रसंगी बोलत होते पुढे बोलताना साठे महाराज म्हणाले की माणसाचं जीवन संघर्षाने भरलं आहे प्रत्येक काम करतांना स्पर्धा आहे आणि



संघर्ष आणि स्पर्धा यातून समाधानकारक मार्गक्रमण करण्याची कला हि ग्रंथराज ज्ञानेश्वरी आणि संत तुकाराम महाराज यांच्या गाथ्यातून शिकविल्या जाते आज विज्ञानाने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली असली तरी विज्ञानातील प्रत्येक गोष्ट सातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरी मध्ये लिहिलेली आहे.

ज्ञान आणि विज्ञान याचा सुरेख संगम पाहायचा असेल तर तो ज्ञानेश्वरीमध्ये आहे आणि अनिष्ट चालीरीती याच्यावर केलेला प्रहार पाहायचा असेल तर तो संत तुकाराम महाराज यांनी लिहिलेल्या गाथ्यात आहे बिघडलेल्या समाजाचा माथा ठिकाण्यावर आणण्याचं काम अतिशय विपरीत परिस्थितीत संत तुकाराम महाराज यांनी केलं म्हणून संतांची वांगमय हि समाजाच्या कल्यानासाठी निर्माण झाली आहेत ती प्रत्येक माणसाने वाचून आत्मसात करावी असा महत्वाचा उपदेश गणेश महाराज साठे यांनी यावेळी केला.

## पंचगव्हाण येथे मोफत रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**तेल्हारा** : सेवाच परमधर्म या ध्येयाने प्रेरित होऊन रुग्णसेवक सौरभ वाघोडे मित्र परिवार यांच्या वतीने एक भव्य मोफत रोगनिदान व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत पंचगव्हाण येथे श्री गजानन महाराज मंदिरा जवळ आयोजित केले आहे. या शिबिरात परिसरातील नागरिकांना विविध आजारांसाठी मोफत तपासणी, सल्लामसलत तसेच निवडक शस्त्रक्रिया सेवा देण्यात येणार आहेत. विशेषज्ञ डॉक्टरांची उपस्थिती- डॉ. रणजीत पाटील व डॉ. कौस्तुभ पाटील अस्थिरोग व सांधेदुखी तज्ञ डॉ. प्रतीक लढा जनरल सर्जरी व युरोलॉजी तज्ञ डॉ. उदित लढा हृदयरोग व मधुमेह तज्ञ डॉ. सौ. सुनीता लढा आदि उपस्थित राहणार आहेत.

## पातुरात 'श्रीं'च्या प्रकट दिनानिमित्त महाआरती महाप्रसादाचा घेतला भाविकांनी लाभ



■पातुर,दि.१४ (प्रतिनिधी)■

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित पातूर-बाळापूर महामार्गावरील चिंचेच्या झाडाखाली , जय गजानन बीछायत केंद्र जवळ सायंकाळी सहा वाजता महाआरती करण्यात आली. मोठ्या संख्येने भाविकांनी श्रींच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. जय गजानन मित्र मंडळाच्या वतीने प्रकट दिनानिमित्त कार्यक्रमाचे अत्यंत शिस्तबद्ध रीत्या आयोजन करण्यात आले होते.यावेळी फटाक्यांची आतषबाजी करीत जय गजानन श्री गजानन व 'गण गण गणात बोते' च्या गजरात संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरनाने न्हाऊन निघाला होता. सायंकाळी सहा वाजता महाआरती झाल्यावर भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली. जय गजानन मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा प्रकट दिनानिमित्त श्रींच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.रात्री उशिरापर्यंत भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच सांप्रदायिक महिला भजन मंडळींनी यावेळी श्रींचे चरणी भक्ती गीते सादर करीत आपली सेवा श्रींच्या चरणी अर्पण केली.

RNINO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale. Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak Local Editor - Purushottam Madhukarrao Dhole. Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्र. ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, खामला स्केअर दुर्गा चौक, अकोला येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक, स्थानिक संपादक : पुरूषोत्तम मधुकरराव ढोले. फोन: ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील)

